वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत हाती घ्यावयाची कामे सुचविण्याकरीता समिती स्थापन करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
इतर मागास , बहुजन कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांकः तांसुयो-२०२१/प्र.क्र.११/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२१.

संदर्भ - १) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दि.३० जानेवारी, २०१८.

२) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन परिपत्रक क्रमांक तांसुयो-२०१७/प्र.क्र.८४/विजाभज-१, दि.११ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्ग या समाजातील लोकांना स्थिर जिवन जगता यावे, त्यांचे राहणीमान उंचवावे तसेच त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्याकरीता संदर्भ क्र.०१ अन्वये वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना राबविण्यात येत आहे. सदरहू योजनांच्या अनुषंगाने हाती घ्यावयाची कामे संबंधित जिल्हाधिकारी यांच्या समितीमार्फत शासनास सादर केली जातात. अशा कामांना शासन स्तरावरून प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून दिला जातो. तथापि सदरहू योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा प्राधान्य देण्याबाबत संबंधित तालुक्यातील लोकप्रनिधींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात येत आहे. यास्तव वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत हाती घ्यावयाची कामे सुचविण्याकरीता समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत हाती घ्यावयाची कामे संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस सुचविण्याकरीता खालीलप्रमाणे तालुका स्तरावर समिती स्थापन करण्यात येत आहे:-

| अ.क्र | प्रतिनिधींचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांनी नेमलेले विधानसभा सदस्य (तालुका निहाय) | अध्यक्ष |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २ | संबंधित जि.प. मधील कार्यकारी अभियंता (निवडण्यात येणाऱ्या कामाशी संबंधित) | सदस्य |
| ३ | संबंधित तालुक्यातील तहसिलदार | सदस्य |
| ४ | संबंधित सहायक आयुक्त समाज कल्याण | सदस्य |
| ५ | संबंधित गट विकास अधिकारी | सदस्य सचिव |

उपरोक्त समिती हाती घ्यावयाची कामे निवडताना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करेल. हाती घ्यावयाची कामे यापुर्वी मान्य / सुरू / पुर्ण झालील नसावी तरोच अशा कामांना इतर कोणत्याही योजनेमधून निधी मिळालेला नसावा. योजनांमध्ये हाती घ्यावयाची कामे ही एका विशिष्ट प्रकारचीच नसावी.कामे निवडताना वस्ती / तांड्याचा समतोल विकास होईल याची दक्षता घ्यावी. हाती घ्यावयाची कामे उपरोक्त समितीमार्फत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या समितीस सादर करण्यात यावीत. तसेच सदरहू समितीने शासनाच्या धोरणानुसार मान्य केलेल्या कामांना जिल्हाधिकारी याच्या समितीने कामांना मान्यता देवून शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आनंद मोळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

१. मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई
३. मा. मंत्री महाराष्ट्र राज्य सर्व
४. सचिव / प्रधान सचिव / उप्पर मुख्य सचिव सर्व विभाग मंत्रालय मुंबई
५. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना जिल्हास्तरीय समिती सर्व जिल्हे
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
७. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, अमरावती विभाग, सर्व
९. सहायक आयुक्त, समाज कल्याण, सर्व.
१०.जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सर्व.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, सर्व.
१०. लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, अमरावती / नागपूर.
११. सह सचिव (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. उप सचिव (का-१४१३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. उप सचिव (व्यय-१४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner

१४. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, इमाव, बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय
१५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इमाव, बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय.
१६. स्वीय सहायक, मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
१७. स्वीय सहायक, मा. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय.
१८. तहसिलदार सर्व
१९. गटविकास अधिकारी सर्व
२०. निवड नस्ती, विजाभज-१

Scanned with CamScanner